पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी पुणे ४११ ०१८
मुख्य लेखापरिक्षण विभाग
पत्र क्र. मुलेप/कावि/गट६/१३/२०१६
दिनांक :- २८/०१/२०१६

**विषय :- निविदा कालावधीबाबत.....**

**संदर्भ :- शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग,**
**क्र. भांखस /२०१४/प्र.क्र.८२/उद्योग-४,**
**दि. ३०/१०/२०१५**

परिपत्रक,

शासकिय/निमशासकीय कार्यालय/मंडळ/महामंडळ/शासकिय उपक्रम/ संस्था/ स्वायत्ता संस्था/ महानगरपालिका/ जिल्हा परिषद /नगर परिषद/नगर परिषद व सार्वजनिक उपक्रम इत्यादी अंतर्गत येणा-या कार्यालयांना विविध साधनसामुग्रीची खरेदी करावी लागते. त्यासाठी शासनाने संदर्भिय शासन निर्णयानुसार वरील संस्थाना कार्यालयीन खरेदीसाठी नियम पुस्तिका निर्गमित केलेली असून सदर पुस्तिकेतील नियम क्र. ४.४.३ व ४.४.३.१ मध्ये निविदेचा कालावधी, निविदा कालावधीस मुदतवाढ इत्यादी बाबी नमुद करण्यात आलेल्या आहेत. सदर तरतूदीनुसार

१) महापालिकेच्या सर्व विभागांनी साधन सामुग्रीची खरेदी करताना निविदा नोटीसमध्ये, उक्त शासन निर्णयात नमुद केलेप्रमाणे निविदा कालावधी नमुद करावा.
२) निविदा स्पर्धात्मक होण्यासाठी कमीत कमी तीन निविदाकार असणे आवश्यक आहे.
३) निविदा चौकशीला ३ पेक्षा कमी निविदाकार मिळाल्यास निविदा उघडण्याच्या कालावधीस प्रथम एक आठवड्याची मुदत वाढ द्यावी.
४) मुदतवाढ दिल्यानंतर देखील ३ पेक्षा कमी निविदाकार मिळाल्यास दुस-यांदा एक आठवड्याची मुदत वाढ देण्यात यावी.
५) त्यानंतर कोणतीही मुदतवाढ देण्यात येऊ नये.
६) अंतिमत: खरेदी अधिका-याने निविदेमधील विविध अटी आणि कामाच्या व्याप्तीचा फेरविचार करून, पुन्हा निविदा प्रक्रिया सुरू करावी.
७) पुन्हा निविदा मागविल्यानंतर देखील निविदेला ३ पेक्षा कमी प्रतिसाद मिळाला तर, खरेदी अधिकारी ज्या निविदाकाराने (एल-१ निविदाकार) निविदा दाखल केली असेल त्या निविदाकाराची, निविदेमध्ये उल्लेख केलेल्या मुल्यांकन निकषाच्या अधीन राहून, निवड करून त्या निविदाकाराबरोबर करार करेल.
८) रूपये दहा ( १० ) लाखापेक्षा कमी रकमेची निविदा असल्यास फक्त एकदाच मुदतवाढ देण्यात यावी.
९) कामाची पूर्तता वेळेवर करण्यास महत्व देण्यात आले तर, खरेदी अधिकारी (दोन वेळा मुदतवाढ दिल्यानंतर देखील) ३ निविदा पेक्षा कमी प्रतिसाद मिळाला तरी त्यासह पुढे जाण्याचा निर्णय घेऊ शकेल व त्यासाठी सुसाध्य कारणे नमुद करेल.
१०) अशा प्रसंगी, किंमतीच्या वाजवीपणाची खात्री करण्यासाठी खरेदी समितीने अतिरिक्त काळजी घेणे आवश्यक आहे.

वरील प्रमाणे निविदा कालावधीबाबत सर्व शाखाप्रमुखांनी कार्यवाही करावी.

**सही/-**
**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८

प्रति,
सर्व शाखाप्रमुख,
------------------------- विभाग